# राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०१९ : काही भाषिक निरीक्षणे

**संतोष मोहन जाधव**
एन. जे. पटेल कला व वाणिज्य
महाविद्यालय, मोहाडी
sj4534901@gmail.com
9405588012

---

३० मे २०१९ रोजी 'कस्तुरीरंगन' समितीने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ चा मसुदा सादर केला. त्या घटनेपासूनच भाषिक पेच प्रसंगांना जनतेला सामोरे जावे लागले. कारण हा मसुदा केवळ हिंदी आणि इंग्रजी या दोनच भाषेमध्ये प्रसिद्ध केला होता. भारतीय संविधानातील २२ अधिकृत भाषांपैकी २० भाषिक लोक या मसुद्याच्या आकलनापासून वंचित राहिले कालांतराने अनेक संघटना व लोकांच्या आग्रहाखातर इतर भाषांमध्ये या मसुद्याच्या सारांश प्रसारित करण्यात आला. एखाद्या शासकीय मसुद्याच्या सारांश अशा पद्धतीने प्रसारित करता येतो का? असा मूलभूत प्रश्न येथे उभा राहतो. कारण कोणत्याही मसुद्यांच्या भाषांतराच्या प्रक्रियेत किंवा सारांश लेखनाच्या प्रक्रियेत त्या मसुद्यातील संपूर्ण आशय सकसपणे येऊ शकत नाही. किंबहुना मसुद्यातील अनेक बाबी सहजपणे दडवणे या प्रक्रियेत शक्य होते. या सर्व बाबींचा विचार करणे येथे यासाठी प्रस्तुत ठरते की, कोणत्याही शासकीय मसुद्याच्या अर्थ लावतांना त्यातील भाषिक बारकावे, अर्थ निष्पत्ती व अर्थ संकीर्णता व भाषिक लवचिकता हे घटक मूळ आशयाचे अनेक प्रकारे अन्वयार्थ लागण्यासाठी कारणीभूत ठरतात.

प्रस्तुत लेखात राष्ट्रीय शिक्षण धोरणातील सरकारी भाषेची रणनीती व शिक्षण क्षेत्रात माध्यम म्हणून भाषेचा सबंध अशा दोन अंगांनी विवेचन केले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मसुद्यात शालेय शिक्षण या भागात 'शालेय संकुल' (School Complex) हा शब्द वारंवार वापरलेला आहे. शालेय संकुल ही संकल्पना मुळातच भांडवली बाजाराच्या दृष्टिकोनातून आली आहे. एखाद्या शहरात ज्याप्रमाणे एखादा मॉल उभा असतो त्या ठिकाणी अनेक वस्तू तेथे भेटतात. त्या वस्तूंची किंमत इतर ठिकाणांपेक्षा अधिक असते परंतु ग्राहकाला आपल्या स्टेटस (Status) नुसार दर्जेदार वस्तू घेतल्याचे समाधान मिळते हेच प्रारूप शिक्षणाच्या क्षेत्रात 'शाळा संकुल' या नावाने उभे राहिले आहे. मसुद्यात म्हटले आहे की, "एखादे विशिष्ट शालेय संकुल म्हणजे एकमेकांशी जोडल्या गेलेल्या किंवा एकसंघ असलेल्या प्रदेशातील १०–२० शासकीय शाळांचा समूह असेल त्या ठिकाणी शिक्षणाचा पायाभूत स्तरापासून इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षण प्रदान करण्यात येईल. माध्यमिक शाळेचे प्राचार्य या शालेय संकुलाचे प्रमुख असतील."[१] तसेच असेही म्हटले आहे की "एखादे विशिष्ट शालेय संकुल म्हणजे एक असे निमस्वायत्त (Semiautonomous) युनिट असेल ज्यामध्ये शिक्षणाच्या पायाभूत स्तरापासून ते इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षण प्रदान करण्यात येईल. यामध्ये माध्यमिक (Secondary School) असलेले (इयत्ता नववी ते बारावी) आणि त्याच्या आसपास सर्व शासकीय शाळा मूलभूत प्राथमिक व माध्यमिक शालेय शिक्षण प्रदान करतील."[२] खरेतर वरील दोन्ही विधानातून सामान्य जनतेला फारसा अर्थ उमगत नाही. परंतु शालेय संकुलाच्या नावाने कोणत्याही शाळेसाठी लागणा–या जागेची संसाधनाची व मनुष्यबळाची सरकारने काटकसर केलेली आहे हे सुज्ञ व्यक्तीच्या लगेच ध्यानात येते. जेथे प्रत्येक शाळेला प्रत्येक स्तरावर एक मुख्याध्यापक आवश्यक असतो तेथे सर्वांचा मिळून केवळ एकच मुख्याध्यापक राहील हे शिक्षक भरतीच्या दृष्टीने अन्यायकारक आहे. तरीसुद्धा चंगळवादी भांडवली जीवनशैलीच्या प्रेमात पडलेल्या

सामान्य जनतेला 'स्कुल कॉम्प्लेक्स' (School Complex) या गोंडस शब्दातून महत्त्वाचा अर्थबोध होत नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मसुद्यात 'समायोजन' हा शब्द अनेक ठिकाणी आढळतो. या शब्दाचा प्रत्यक्षात अर्थ 'शाळा बंद पाडणे' असा आहे. परंतु सौम्य शब्दाची निवड केल्यावर त्याच्या परिणामाची तीव्रता सुद्धा लोकांना जाणवत नाही. २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे समायोजन केले आहे. असे म्हटल्यावर परिणामाची तीव्रता कमी होतेच. परंतु त्यासोबतच पटसंख्या कमी असण्याची तार्किकता सुद्धा लोकांना पटू लागते. वास्तविक पाहता प्रत्येक गावातील शासकीय शाळा ही त्या गावातील विद्यार्थ्यांच्या महत्त्वाचा अधिकार असते. परंतु सरकारी शैलीमध्ये निवडलेल्या सौम्य शब्दांनी लोकांची जाणीव बोथट होऊन जाते. अशाच प्रकारे Inclusion हा शब्द भारतीय राज्यघटनेत कुठेच दिसत नाही. 'अंतर्भाव करणे' असा या शब्दाचा अर्थ होतो हा शब्द मसुद्यात अनेक ठिकाणी आढळतो या शब्दातून शिक्षणाच्या मूलभूत अधिकारांची जाणीव न होता सरकारच्या दयाबुद्धीची जाणीव अधिक प्रमाणात होते. अशाच प्रकारे Equality 'समता' या शब्दाऐवजी Equity 'न्यायबुद्धी' या शब्दाचा अधिक वापर करण्याचे चलन सुरू असल्याचे दिसते. अशा अनेक शब्दांमुळे सरकारची नीती स्पष्ट होते होत जाते.

राष्ट्रीय शिक्षण धोरणात पहिल्यांदाच ECCE म्हणजे Early Childhood Care Education अर्थात पूर्व प्राथमिक शिक्षणाचा उल्लेख आला आहे. वरकरणी पाहता ही बाब स्वागतार्ह वाटते परंतु विशि ट धर्माधि ठता असलेल्या विचारसरणीचे लोक त्या धोरणाची अंमलबजावणी करतात तेव्हा मात्र या शिक्षणातील आशयाबद्दल संदेह वाटू लागतो.

पूर्व प्राथमिक शिक्षणाची तरतूद येथे केली असली तरी त्यासाठी लागणाऱ्या कार्यक्रमांच्या नियुक्तीबद्दल व त्यांच्या मोबदल्यासंदर्भात पुरेसे स्पष्ट विवेचन केले नाही. शिवाय या कामासाठी ठराविक स्वयंसेवक (Valunters) नियुक्त केले जातील असे म्हटले आहे. भारतातील एका सर्वात मोठ्या उजव्या विचारसरणीच्या संघटनेच्या कार्यकर्त्यांना 'स्वयंसेवक' म्हटले जाते आणि Volunteers या शब्दांचा मराठी अनुवाद – स्वयंसेवक असा होतो. या दोन बाबींमध्ये काही परस्पर संबंध असेल का? अशी शंका सुद्धा वाटू लागते. अशा प्रकारे मसुद्यातील भाषा ही निरनिराळे अर्थबोध करून देणारी ठरते. कुठल्याही शासकीय मसुद्यातील भाषा ही ज्याप्रमाणे संदिग्ध, अनेकार्थी, लवचिक व सरकारधार्जीनी असते तशीच या मसुद्यातील भाषा सुद्धा आहे.

भाषेच्या आणि शिक्षणाच्या जवळचा संबंध आहे अनेकदा वर्चस्व गाजवणाऱ्या गटाचा भाषा ही अनुकरणीय ठरते व लोकभाषेतील शिक्षणाला कमी महत्त्व प्राप्त होते. जागतिकीकरणाच्या नंतरच्या काळात भाषिक कौशल्य, जागतिक भाषा आत्मसात करणे तसेच बहुभाषिक असल्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

द्विभाषिक अथवा बहुभाषिक बनण्याला आजचे जग अनुकूल आहे. ज्या सहजतेने आपण मातृभाषा वापरतो त्या सहजतेने दुसरी भाषा अथवा दुसऱ्या भाषा वापरल्या म्हणजे ती व्यक्ती द्विभाषिक अथवा बहुभाषिक बनते असे नसून ज्यावेळी आवश्यक असेल त्यावेळी मर्यादित उद्दिष्ट्ये लक्षात घेऊन का होईना, परंतु दुसऱ्या भाषेचा वापर करण्याचे सामर्थ्य मिळविणे हे द्विभाषिकतेकडे नेण्याला योग्य मान्यता येईल. हा विचार आजच्या परभाषेचा अध्यापन पद्धतीचे अधिष्ठान आहे.[३] रा. सो. सराफ यांच्या हा युक्तिवाद योग्य वाटत असला तरी शिक्षणामध्ये कोणत्याही एका भाषेचे प्राबल्य हे सांस्कृतिक विकासाला धरून राहत नाही. आज इंग्रजीचा

शिक्षणात भाषा म्हणून अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु माध्यम म्हणून स्वीकारण्यात व इंग्रजी माध्यम लोकप्रिय होण्यात खाजगी शाळेचे हितसंबंध दडलेले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणात मातृभाषेचा आग्रह धरल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. परंतु ''जेवढे शक्य होईल तेवढे असे म्हटल्यामुळे त्याच्या पळवाटा सुद्धा खुल्या होतात म्हणूनच या धोरणात मातृभाषेचा जोरकसपणे पुरस्कार केला जाईल असे समजणे भ्रामक आहे.'' इंग्रजी माध्यमाचा पुरस्कार व बडेजाव करत खाजगी शाळांचे प्रमाण वाढले आहे. ज्यामधून शिक्षण क्षेत्राला बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे मातृभाषेचा शिक्षण क्षेत्रात विचार अधिक जाणीवपूर्वक सजगपणे व्हायला हवा.

राष्ट्रीय शिक्षण धोरणात संस्कृत भाषेला अवाजवी/अधिक महत्त्व देण्यात आले आहे. संस्कृत ही लोकभाषा कधीही नव्हती उलट ज्ञानाच्या बंदिस्तीकरणात संस्कृतचा मोठा वाटा आहे. जी भाषा कधीही बहुसंख्य लोकांची भाषा नव्हती त्या भाषेकरिता निरनिराळे उपक्रम राबविले जातील असे स्पष्ट केले आहे. ''आदिवासी भाषांसह सर्व भारतीय भाषांना जेव्हा योग्य सन्मान दिला जाईल तेव्हाच देशातील प्रत्येक प्रदेशाचा संस्कृती व परंपरांचे ख—या अर्थी अंतरभावाची व संवर्धनाची पूर्तता होईल.''[४] सर्व भाषांना 'सन्मान' दिला जाईल म्हणजे नेमके काय? याची स्पष्टता याबाबत दिसत नाही. मसुद्यामध्ये फारसी व प्राकृत भाषांसाठी राष्ट्रीय संस्थेची स्थापना करण्यात येईल अशी मसुद्यात म्हटले आहे. परंतु भटक्या विमुक्त जमातीच्या बोलींची कुठलीच दखल घेण्यात आली नाही.

थोडक्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणातील एकंदर भाषा, माध्यम म्हणून कोणत्या भाषेला झुकते माप द्यायचे याबद्दलची निती व भारतीय भाषाबद्दलच्या सरकारचा दृष्टीकोण अशा अनेक बाबी या निमित्ताने अभ्यासनीय ठरतात.

**संदर्भ :**


१. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ मसुदा, 'शालेय शिक्षण प्रकरण — ७ (इ)'.
२. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ मसुदा, 'शालेय शिक्षण प्रकरण — ७ (ई)'.
३. रा. सो. सराफ, 'भाषा, मातृभाषा आणि परभाषा' श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्रमांक ८५.
४. लक्ष केंद्रित करावयाच्या अतिरिक्त महत्त्वाच्या बाबी 'प्रकरण — ४ (उद्देश)'.